# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

3, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक 1967, मुंबई 400 001.

दूरध्वनी – 22620601/22690602/22641150/22641151 फॅक्स - 2269 2102.

E-Mail: desk2a@dtemaharashtra.gov.in Internet: http://www.dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

क्रमांक: २अ/एडीएम /२०१८/ १०४४

दिनांक : 10 AUG 2018

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मध्ये प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या मागास प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणेस मुदतवाढ देणेबाबत....

संदर्भ: १.संचालनालयाचे परिपत्रक क्रमांक २अ/एडीएम/२०१८/८७२, दिनांक १२.७.२०१८

२. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे पत्र क्रमांक सीईटीसेल/ तंत्र/ संकीर्ण /२०१८/१०५६

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांनी शासनाच्या दिनांक २४.६.२०१८ रोजीच्या अध्यादेशास अनुसरून शैक्षणिक वर्ष २०१८-१९ मधील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरिता मागास प्रवर्गातील उमेदवारांना प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून अर्ज स्वीकृती व प्रवेश प्रक्रियेत सहभागी करून घेण्यात आले आहे. अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत संदर्भाधीन पत्रान्वये सूचना निर्गमित केल्या आहेत. त्यानुसार अभ्यासक्रमनिहाय जात वैधता व नॉन क्रिमी लेअर प्रमाणपत्र सादर करण्यासाठीचे दिनांक निश्चित करण्यात आलेले आहेत.

यासंदर्भात शासनाकडून तसेच महासंचालक, बार्टी तथा मुख्य समन्ववयक जात प्रमाणपत्र पडताळणी समिती पुणे यांचेकडून प्रमाणपत्र सादर करण्याच्या अंतिम दिनांकांना मुदतवाढ देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. सदर निर्देश विचारात घेऊन राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडून संदर्भाधीन पत्रान्वये १० ऑगस्ट २०१८ पर्यंत जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी मुदत दिलेल्या व खालील अभ्यासक्रमांकरिता प्रवेश घेतलेल्या मागासवर्गीय प्रवर्गातील उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ देण्याबाबत कळविले आहे. त्यानुसार अभ्यासक्रमनिहाय जात वैधता प्रमाणपत्र करण्याची अंतिम मुदत खालीलप्रमाणे वाढविण्यात येत आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नाव | प्रमाणपत्र सादर करण्यास पूर्वीची मुदत दि. | प्रमाणपत्र सादर करण्यास सुधारीत मुदतवाढ दि. |
|---|---|---|---|
| १ | प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी | १०.८.२०१८ | १४.८.२०१८ |
| २ | प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र व फार्म डी पदवी | १०.८.२०१८ | १४.८.२०१८ |
| ३ | प्रथम वर्ष वास्तुशास्त्र पदवी | १०.८.२०१८ | १४.८.२०१८ |
| ४ | प्रथम वर्ष हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरिंग टेकनॉलॉजी पदवी | १०.८.२०१८ | १४.८.२०१८ |
| ५ | प्रथम वर्ष एमबीए/एमएमएस पदव्युत्तर पदवी | १०.८.२०१८ | १४.८.२०१८ |

उर्वरीत अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी निर्धारीत केलेली अंतिम मुदतीमध्ये कोणताही बदल करण्यात आलेला नाही याची नोंद घ्यावी.

वरील अभ्यासक्रमांना प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी मुदतवाढ दिलेल्या दिनांकापर्यंत जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याची दक्षता घ्यावी. सदर मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास अशा उमेदवारांचे प्रवेश रद्द करण्यात येतील याचीही सर्व संबंधित उमेदवारांनी नोंद घ्यावी.

तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी आणि पदव्युत्तर संस्थांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेतील प्रवेश वाटप झालेल्या ज्या उमेदवारांनी वरील प्रमाणपत्रासाठी अर्ज केल्यासंबंधातील पावती सादर करून प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेतला होता त्यांचेकडून वरील मुदतीत आवश्यक प्रमाणपत्र सादर केल्यानंतर त्वरीत त्याची ऑनलाईनपध्दतीने न चुकता नोंद करण्यात यावी व त्याची पोचपावती संबंधित उमेदवारांना त्वरीत देण्यात यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांना सविनय सादर

प्रत : माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी :

१. सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,मुंबई,पुणे,नाशिक,अमरावती,औरंगाबाद,नागपूर-त्यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रक आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांना कळविण्यात यावे.
२. संबंधित सर्व प्रवेश निश्चिती केंद्र,त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त सूचनेप्रमाणे उमेदवारांनी सादर केलेले प्रमाणपत्र ऑनलाईन पध्दतीने नोंद करुन त्याची पोचपावती संबंधित उमेदवारास देण्याची कार्यवाही करावी.